ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 215 / 2009 / 49 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Nevse Chabanrao Dnyandeo, Rambai Road, Shivajinagar, Waluj, Dist.Aurangabad. (Consumer No. 506560255463)

Dear Sir,

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** Shri Nevse Chabanrao Dnyandeo, Rambai Road, Shivajinagar, Waluj, Dist.Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. **The hearing in the matter will be held on** 0**2.06.2009 at 12=30 Hrs.**

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

**Copy to:-**

**Shri Nevse Chabanrao Dnyandeo,**
**Rambai Road,**
**Shivajinagar, Waluj,**
**Dist. Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१५/२००९/४९**

**तक्रार दाखल दिनांक :- २१/०५/२००९**
**निकाल दिनांक :- ३०/०६/२००९**

**श्री नेवसे छबनराव ज्ञानदेव,**
**रामराई रोड, शिवाजीनगर,वाळुज**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.५०६५६०२५५४६३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**ग्रामीण विभाग औरंगाबाद.**
**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २१/०५/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना मीटर वरील नोंदीप्रमाणे बिल आकारणी न करता सतत सरासरीवर आधारीत बिल आकारणी करण्यात आली.याबाबतीत त्यांनी महावितरण वीज कंपनीच्या संबंधीत विभागाकडुन तक्रार नोंदविली पण त्यांची कोणतीही दखल न घेता त्यांचा वीज पुरवठा थकीत वीज बिलापोटी खंडीत करण्यात आला. अर्जदाराने महावितरण वीज कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०२/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री नेवसे उपस्थित होते महावितरण तर्फे नोडल अधिकारी कु.एस.बी.चिवंडे उपस्थित होत्या. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे मान्य केले व पुढील सुनावणी अगोदर बिल रिव्हीजन प्रस्ताव दाखल करण्याची परवानगी मागितली.मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०९/०६/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०९/०६/२००९ रोजी अर्जदार श्री नेवसे उपस्थित होते नोडल अधिकारी किंवा महावितरण तर्फे कोणीही उपस्थित नव्हते. अर्जदाराने त्यांना कंपनीमधून सुटी घेऊन सुनावणीस यावे लागते असल्याचे सांगत नुकसान भरपाईची मागणी केली. मंचाने पुढील सुनावणी १६/०६/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १६/०६/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे बिल दुरुस्त करुन २१९०=१७/-रुपयाचे सुधारीत बिल मंचात दाखल केले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) अर्जदार व महावितरण तर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन महावितरण तर्फे त्यांच्याकडे ४७७३८०३ क्रमांकाचे वीज मीटर बसविण्यात आले आहे.या मीटरवर वीज वापराची नोंद दिसत (डिस्पले) नसल्यामुळे महावितरण तर्फे अर्जदारास सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात येत होते. अर्जदाराच्या सि.पी.एलचे अवलोकन केल्यावर असे दिसुन येते की फेब्रुवारी २००७ ते जानेवारी २००८ या काळात अर्जदारास मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात आले. पण फेब्रुवारी २००८ ते जुलै २००८ या काळात **INACCE** स्टेटस दाखवत सरासरी १०७ युनीटचे वीज बिल आकारणी करण्यात आली ऑक्टोबर २००८ मध्ये त्यांना ९ महीन्याचे एकुण १२४० युनीट वीज वापराचे बिल देण्यात आले. नोव्हेबर २००८ मध्ये २६१ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आल्यानंतर डिसेंबर २००८ ते एप्रिल २००९ या काळात त्यांनी मीटरवर रिडींग दिसत नसल्यामुळे १५८ युनीट वीज वापराचे सरासरीवर आधारीत बिल देण्यात आले. जे चुकीचे असल्याचे मंचाचे मत आहे.मीटर मधील दोषामुळे वीज वापराची योग्य नोंद होत नसल्यामुळे अशाप्रसंगी मा.वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्जदारास मागील १२ महीन्याचा

सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करणे योग्य ठरेल असे मंचाचे मत आहे. नोडल अधिकारी अर्जदाराचा मागील १२ महीन्याचा सरासरी १३३ युनीट प्रतिमाह वीज वापर धरुन वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव मंचात दाखल केला आहे जो योग्य असल्याचे मंचाचे मत आहे. मंचाने ठरविलेल्या सुनावणीस उपस्थित न राहणे व जवाब दाखल करण्यास लावलेला विलंब याबाबत नुकसान भरपाई देण्याची अर्जदाराने केलेली मागणी योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) महावितरण वीज कंपनीने अर्जदारास डिसेबर २००८ ते मे २००९ (मीटर बदली काळापर्यंत) अर्जदारास १३३ युनीट प्रतिमाह प्रमाणे वीज बिल आकारणी करावी व ३० दिवसात अर्जदारास सुधारीत वीज बिल द्यावे.

२) अर्जदारास वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये व अर्जदाराने या काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

३) महावितरण कपनीने अर्जदारास रुपये ५००/-नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१५/२००९/४९** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री नेवसे छबनराव ज्ञानदेव,**
**रामराई रोड, शिवाजीनगर,वाळुज**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.५०६५६०२५५४६३)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रा/२१५/२००९/४९ )

आपण दिनांक २१/०५/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**